Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
सत्याचे प्राईम्स
# जन सम्राट टाईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। सोमवार, दि. १३ जूलै २०२६ । वर्ष १ । अंक ९५ । पाने २ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

पूराच्या विळख्यात आईचा मृतदेह छतावर

(पान २ वर)



» Selected

## पेरणीचा टक्का वाढला; राज्यात ५९ टक्के पेरण्या

**मुंबई :** | राज्यभरात जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाने सर्वदूर हजेरी लावली. समाधानकारक पावसामुळे खरीप पेरण्यांचा टक्का वाढला असून, राज्यात रविवारी, बारा जुलैअखेर ८४ लाख ६१ हजार ६९ हेक्टरवर म्हणजेच ५९ टक्के क्षेत्रावर पेरणी झाली आहे. गतवर्षी याच काळात ८२ टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या. कोकण, पुणे, कोल्हापूर विभाग पिछाडीवर असून, अमरावती विभागात सर्वाधिक ८१ टक्के पेरणी झाली आहे. जुलैच्या सुरुवातीपर्यंत राज्यभरात जेमतेम २८ टक्के क्षेत्रावर पेरण्या झाल्या होत्या. पण जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राज्यात सर्वदूर पाऊस पडला, त्यामुळे पेरण्यांचा टक्का वाढल्याचे दिसून येत आहे. रविवारीपर्यंत राज्यात एकूण ८५ लाख ६१ हजार ६९ हेक्टरवर म्हणजेच एकूण ५९ टक्के पेरणी झाली आहे. गतवर्षी याच काळात १ कोटी १८ लाख ६२ हजार ६०० हेक्टरवर म्हणजेच ८२ टक्के क्षेत्रावर पेरणी झाले होती.

### पवारांना पुन्हा एनडीएत येण्याचे आवाहन • '२०२९ पर्यंत फडणवीसच मुख्यमंत्री' असा दावा

# 'पवारांनी एनडीएमध्ये यावे'; आठवलेंचे आमंत्रण!

## राष्ट्रपती होण्याची संधी मिळाली असती, असा दावा; महाविकास आघाडीवर टीका

जन सम्राट टाईम्स

**पुणे । राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीत (एनडीए) सहभागी व्हावे, असे खुले आवाहन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आरपीआय)चे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केले आहे.**

शरद पवार हे देशातील ज्येष्ठ आणि प्रभावी नेते असून त्यांनी यापूर्वी एनडीएमध्ये सहभागी होण्याचा प्रस्ताव स्वीकारला असता तर ते देशाचे राष्ट्रपतीही झाले असते, असा दावा त्यांनी केला. पुण्यात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना आठवले यांनी विविध राजकीय घडामोडींवर भाष्य केले. यावेळी आरपीआयचे शहराध्यक्ष संजय सोनवणे, उपमहापौर परशुराम वाडेकर, प्रदेश सचिव बाळासाहेब जानराव, महिपाल वाघमारे, नगरसेविका हिमाली कांबळे, मोहन जगताप यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. रामदास आठवले म्हणाले, "शरद पवारांचा पक्ष आजही एनडीएमध्ये सहभागी होऊ शकतो. त्यात समाजाचे आणि देशाचे हित



आहे. आम्ही त्यांना यापूर्वीही निमंत्रण दिले होते आणि आजही ते आमंत्रण कायम आहे." राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, शरद पवार गट आणि अजित पवार गट यांचे विलीनीकरण झाले असते तर अजित पवार पक्षाध्यक्ष झाले असते. मात्र, सध्याच्या राजकीय परिस्थितीत दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेनेतील घडामोडींवर भाष्य करताना आठवले यांनी ठाकरे गटावर टीकास्त्र सोडले. "'ऑपरेशन टायगर' हे भाजप किंवा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घडवून आणलेले नाही. उद्धव ठाकरे यांच्या राजकीय निर्णयांचे ते फलित आहे. त्यांनी महाविकास आघाडीची स्थापना केली नसती तर आज त्यांच्यावर ही परिस्थिती ओढवली नसती," असे ते म्हणाले. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विश्वास असल्यामुळे इतर पक्षांतील नेते आणि कार्यकर्ते शिवसेनेत प्रवेश करत असल्याचाही दावा त्यांनी केला. मुख्यमंत्रीपदाबाबत सुरू असलेल्या चर्चांवरही आठवले यांनी प्रतिक्रिया दिली. "२०२९ पर्यंत देवेंद्र फडणवीस हेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहतील. भाजप भविष्यात एकनाथ शिंदे यांना पुन्हा मुख्यमंत्री होऊ देणार नाही," असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. भाषावादाच्या मुद्द्यावर बोलताना आठवले म्हणाले, "मातृभाषेचा अभिमान बाळगणे आवश्यक आहे. मात्र, त्या अभिमानातून इतर भाषांचा द्वेष करणे हे संविधानाच्या भावनेच्या विरोधात आहे. मुंबईत मराठीसोबत मोठ्या प्रमाणात इतर भाषिक नागरिक राहतात. त्यामुळे हिंदी किंवा इतर भाषेत भाषण करणे चुकीचे नाही." रामदास आठवले यांच्या या वक्तव्यांमुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चांना उधाण आले असून, विशेषतः शरद पवारांना दिलेल्या एनडीए प्रवेशाच्या खुल्या आमंत्रणाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

### ठाकरे गटावर टीकास्त्र सोडले

"शरद पवारांचा पक्ष आजही एनडीएमध्ये सहभागी होऊ शकतो. त्यात समाजाचे आणि देशाचे हित आहे. यापूर्वीही निमंत्रण दिले होते आणि आजही ते आमंत्रण कायम आहे." राष्ट्रवादी काँग्रेसचे दोन गट पुन्हा एकत्र येण्याच्या चर्चांबाबत बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, शरद पवार गट आणि अजित पवार गट यांचे विलीनीकरण झाले असते तर अजित पवार पक्षाध्यक्ष झाले असते. मात्र, सध्याच्या राजकीय परिस्थितीत दोन्ही गट पुन्हा एकत्र येण्याची शक्यता अत्यंत कमी असल्याचे त्यांनी सांगितले. शिवसेनेतील घडामोडींवर भाष्य करताना आठवले यांनी ठाकरे गटावर टीकास्त्र सोडले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## सीलबंद घरातील कोट्यवधींची रोकड लंपास करण्याचा कट?

### जळगावातील घरात घरफोडीचा प्रयत्न

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी:** आधीच अडचणीत आलेले अकोला येथील जिल्हा उपनिबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी किरण चौधरी यांच्या अडचणीत आणखी भर पडली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) सील केलेल्या जळगावातील त्यांच्या घरात कथित घरफोडीचा कट रचल्याप्रकरणी जिल्हापेठ पोलिसांनी चौधरी यांना अटक केली आहे. या कारवाईमुळे महसूल विभागात आणि जळगाव जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी लाचखोरीच्या प्रकरणात एसीबीने किरण चौधरी यांच्यावर कारवाई केली होती. त्यानंतर तपासाचा भाग म्हणून जळगावातील त्यांचे निवासस्थान कायदेशीररीत्या सील करण्यात आले होते. या सीलबंद घरात मोठ्या प्रमाणावर रोकड आणि मौल्यवान दागिने असल्याचा तपास यंत्रणांना संशय होता. दरम्यान, मध्यरात्रीच्या सुमारास दोन संशयित तरुण सीलबंद घराच्या भिंतीवरून आत प्रवेश करत असताना पोलिसांनी त्यांना रंगेहात पकडले. या घटनेनंतर पोलिसांनी सखोल चौकशी सुरू केली असता धक्कादायक माहिती समोर आल्याचा दावा करण्यात आला आहे.पोलिसांच्या प्राथमिक तपासानुसार, किरण चौधरी यांनीच आपल्या शालक मनोज झोपे यांच्या मदतीने हा संपूर्ण कट रचल्याचा आरोप आहे. सीलबंद घरातील कथित कोट्यवधी रुपयांची रोकड आणि दागिने तपास यंत्रणांच्या हाती लागू नयेत, यासाठी ते बाहेर काढण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. या प्रकरणी जिल्हापेठ पोलिस ठाण्यात किरण चौधरी आणि मनोज झोपे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अटक केल्यानंतर चौधरी यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना एक दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील दुसरा प्रमुख आरोपी मनोज झोपे सध्या फरार असून त्याचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी विशेष पथके रवाना केली आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असून, तपासातून आणखी काही धागेदोरे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## मैत्रीचा विश्वासघात! कथित अनैतिक संबंधांच्या वादातून मित्राचाच गळा आवळून खून

जन सम्राट टाईम्स

**रावेर| प्रतिनिधी :** रावेर तालुक्यातील नांदूरखेडा शिवारात कपाशीच्या शेतात आढळलेल्या ३० वर्षीय मजुराच्या मृत्यूचे गूढ रावेर पोलिसांनी अल्पावधीत उलगडले असून, कथित अनैतिक संबंधांच्या वादातून दोन मित्रांनी मिळून त्याचा गळा आवळून खून केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात एका आरोपीला अटक करण्यात आली असून मुख्य आरोपीलाही मध्यप्रदेशातून ताब्यात घेण्यात आल्याने खुनामागील धक्कादायक कट समोर आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शेख कुरबान शेख शब्बीर (वय ३०) हा ९ जुलैच्या रात्रीपासून बेपत्ता होता. त्याचा शोध सुरू असतानाच ११ जुलै रोजी सकाळी नांदूरखेडा शिवारातील कपाशीच्या शेतात त्याचा मृतदेह आढळून आला. सुरुवातीला मृत्यूचे कारण स्पष्ट नव्हते. मात्र शवविच्छेदन अहवालात गळा दाबून हत्या झाल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पोलिसांनी तपासाची सूत्रे वेगाने फिरवली. तपासादरम्यान पोलिसांना महत्त्वाचे धागेदोरे मिळाले. त्यानुसार मुख्य संशयित



गणेश संजय घोरपडे याचे मयताच्या पत्नीशी कथित अनैतिक संबंध असल्याची माहिती समोर आली. एप्रिल २०२६ मध्ये ऐनपूर येथे दोघांना रंगेहात पकडल्यानंतर गणेश घोरपडे याला मारहाण करण्यात आली होती. त्या घटनेचा राग मनात धरून त्याने शेख कुरबानला जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तपासात उघड झाले. पोलिसांच्या तपासानुसार, ९ जुलैच्या रात्री गणेश घोरपडे आणि मेघराज वसंत सांगळे यांनी शेख कुरबान याला दारू पाजून मोटारसायकलवरून नांदूरखेडा शिवारात नेले. निर्जन ठिकाणी नेल्यानंतर दोघांनी मिळून त्याचा हाताने गळा आवळून खून केला आणि पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह कपाशीच्या शेतात टाकून घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी मयताचा भाऊ शेख सलमान शेख शब्बीर (रा. उचंदा, ता. मुक्ताईनगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३४३/२०२६ दाखल करण्यात आला आहे. भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१) व ३(५) अंतर्गत गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला.

तपासादरम्यान मेघराज वसंत सांगळे याला अटक करण्यात आली. तर मुख्य आरोपी गणेश संजय घोरपडे याला मध्यप्रदेशातील सागर जिल्ह्यातील जयशिनगर (सागवानी तहसील) येथून ताब्यात घेण्यात आले आहे. दोन्ही आरोपींकडे अधिक चौकशी सुरू असून या गुन्ह्याशी संबंधित आणखी काही बाबी समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस निरीक्षक संदीप पाटील आणि पोलीस उपनिरीक्षक तुषार सुधाकर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. अल्पावधीत तांत्रिक आणि परिस्थितीजन्य पुराव्यांच्या आधारे हत्येचा छडा लावून आरोपींना जेरबंद करण्यात रावेर पोलिसांना यश आले असून, त्यांच्या या वेगवान आणि कौशल्यपूर्ण तपासाचे परिसरात कौतुक होत आहे.

## "संजय दत्तने माहिती दिली असती तर १९९३ चे मुंबई बॉम्बस्फोट टळले असते" : उज्ज्वल निकम

जन सम्राट टाईम्स

**मुंबई| प्रतिनिधी :** बॉलीवूड अभिनेता राजकुमार राव सध्या आपल्या आगामी 'प्रहार' या चित्रपटामुळे चर्चेत असून, या चित्रपटात तो प्रसिद्ध सरकारी वकील उज्ज्वल निकम यांची भूमिका साकारत आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने दिलेल्या एका मुलाखतीत उज्ज्वल निकम यांनी १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोटांबाबत आणि अभिनेता संजय दत्त याच्याविषयी महत्त्वपूर्ण विधान केले आहे. 'द लल्लनटॉप'ला दिलेल्या मुलाखतीत बोलताना निकम यांनी दावा केला की, संजय दत्तने योग्य वेळी पोलिसांना माहिती दिली असती,



तर १९९३ मधील मुंबई बॉम्बस्फोट रोखता आले असते आणि शेकडो निरपराध नागरिकांचे प्राण वाचले असते. निकम यांनी सांगितले की, बॉम्बस्फोटांपूर्वी अबू सालेम मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रांचा साठा घेऊन मुंबईत आला होता. या शस्त्रांमध्ये एके-४७ रायफल, हँड ग्रेनेड आणि इतर घातक शस्त्रांचा समावेश होता. त्यापैकी काही शस्त्रे संजय दत्तकडे ठेवण्यात आली होती. नंतर त्याने हँड ग्रेनेड परत केल्याचेही त्यांनी नमूद केले. यावेळी निकम म्हणाले की, संजय दत्तला या शस्त्रसाठ्याबाबत माहिती होती. जर त्याने ही माहिती तत्काळ पोलिसांना दिली असती, तर पोलिसांनी तातडीने कारवाई करून संपूर्ण कट उधळून लावला असता. बॉम्बस्फोटाच्या कटात सहभागी असलेल्या अनेकांना अटक झाली असती आणि हा भीषण दहशतवादी हल्ला टाळण्याची शक्यता होती, असे त्यांनी स्पष्ट केले. तथापि, निकम यांनी संजय दत्तच्या भूमिकेबाबत महत्त्वाचा खुलासाही केला. "संजय दत्त हा दहशतवादी नव्हता आणि दहशतवादी हल्ला घडवून आणण्याचा त्याचा हेतू नव्हता," असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले. मात्र, त्याच्याकडे असलेली माहिती वेळेत पोलिसांपर्यंत पोहोचली असती, तर परिस्थिती वेगळी असती, असे त्यांचे मत आहे.

## डॉ. अनिल पावसे यांना 'राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार

### उल्हासनगरमध्ये अभिनंदनाचा वर्षाव



जन सम्राट टाईम्स

**ठाणे | प्रतिनिधी :** उल्हासनगर येथील हनुमान व्यवस्थापक मंडळ संचलित छत्रपती शिवाजी महाराज प्राथमिक शाळेचे अध्यक्ष डॉ. अनिल गणपत पावसे यांना शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक आणि संस्कारक्षम कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेत 'राष्ट्रीय शिक्षणरत्न पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. या सन्मानामुळे उल्हासनगर शहरासह ठाणे जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्राचा गौरव वाढला असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

स्विफ्ट एन लिफ्ट मीडिया ग्रुपच्या वतीने पिंपरी-चिंचवड येथील आचार्य अत्रे रंगमंदिरात आयोजित भव्य राष्ट्रीय पुरस्कार वितरण सोहळ्यात हा सन्मान प्रदान करण्यात आला. देशभरातील शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट, मूल्याधिष्ठित आणि नाविन्यपूर्ण कार्य करणाऱ्या निवडक शिक्षणतज्ज्ञांचा यावेळी गौरव करण्यात आला. या सोहळ्यास महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, पिंपरी-चिंचवडच्या महापौर मंजुषा नागपुरे, आमदार शंकरराव जगताप, स्विफ्ट एन लिफ्ट मीडिया ग्रुपचे संस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश साबे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते डॉ. पावसे यांना सन्मानचिन्ह (ट्रॉफी) आणि गौरवपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. डॉ. अनिल पावसे यांनी गेली अनेक दशके शिक्षण क्षेत्रात गुणवत्तापूर्ण आणि मूल्याधिष्ठित शिक्षणाचा ध्यास घेत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने कार्य केले आहे. शिक्षणाबरोबरच समाजसेवा, साहित्य, संस्कृती, योग, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक जनजागृती या विविध क्षेत्रांतही त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या कार्यामुळे अनेक विद्यार्थी आणि पालकांना प्रेरणा मिळाली असून समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केला आहे. त्यांच्या या बहुआयामी कार्याची दखल घेत राष्ट्रीय स्तरावरील हा प्रतिष्ठेचा पुरस्कार जाहीर करण्यात आला. पुरस्कार स्वीकारल्यानंतर डॉ. पावसे यांनी हा सन्मान विद्यार्थ्यांना, शिक्षकांना आणि समाजातील सर्व सहकाऱ्यांना समर्पित असल्याची भावना व्यक्त केली.

### उल्हासनगरच्या शिरपेचात मानाचा तुरा

या यशाबद्दल विविध शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक संस्थांनी तसेच मित्रपरिवार, हितचिंतक आणि नागरिकांनी डॉ. पावसे यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या राष्ट्रीय सन्मानामुळे उल्हासनगरच्या शैक्षणिक क्षेत्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेल्याची भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज ज

## शासकीय वसतिगृहात अन्नातून विषबाधा: 25 विद्यार्थी रुग्णालयात दाखल

### शहादा येथील समाजकल्याण विभागाच्या निवासी वसतिगृहातील धक्कादायक घटना

जन सम्राट टाईम्स

**शहादा | प्रतिनिधी:** नंदुरबार जिल्ह्यातील शहादा येथील समाजकल्याण विभागाच्या शासकीय निवासी वसतिगृहात शनिवारी रात्री जेवणानंतर तब्बल ४० विद्यार्थ्यांची प्रकृती अचानक बिघडल्याने एकच खळबळ उडाली. विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्या, पोटदुखी आणि अस्वस्थतेचा त्रास सुरू झाल्यानंतर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. यापैकी २५ विद्यार्थ्यांवर उपचार सुरू असून, सर्वांची प्रकृती सध्या स्थिर असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी रात्री वसतिगृहातील विद्यार्थ्यांना नियमित जेवण देण्यात आले होते. जेवण केल्यानंतर काही वेळातच अनेक विद्यार्थ्यांना मळमळ, उलट्या आणि पोटदुखीचा त्रास सुरू झाला. काही विद्यार्थ्यांची प्रकृती अधिक खालावल्याने त्यांना तातडीने शहादा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले, तर काहींना पुढील उपचारासाठी खासगी रुग्णालयात हलविण्यात आले. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांनी रुग्णालयात भेट देऊन विद्यार्थ्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

त्यांनी सांगितले की, प्राथमिक तपासात अन्नातून विषबाधा अथवा गॅस्ट्रायटिसचा प्रकार असण्याची शक्यता आहे. सध्या २० विद्यार्थ्यांवर शहादा ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू असून, ऑक्सिजनची गरज आणि रक्तदाबातील चढ-उतार लक्षात



घेता पाच विद्यार्थ्यांना अतिदक्षता विभागात (ICU) दाखल करण्यात आले आहे. वैद्यकीय पथक त्यांच्या प्रकृतीवर सातत्याने लक्ष ठेवून असून सर्वांची प्रकृती नियंत्रणात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

घटनेनंतर प्रशासनाने जेवणाचे नमुने तसेच विद्यार्थ्यांच्या उलट्यांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले आहेत. या अहवालानंतर विषबाधेचे नेमके कारण स्पष्ट होणार असून, त्यानुसार पुढील कारवाई केली जाणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. सेठी यांनी सांगितले की, तपास अहवाल आल्यानंतर संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. मुख्याध्यापक, समाजकल्याण अधिकारी, वॉर्डन आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या भूमिकेची चौकशी सुरू असून, निष्काळजीपणा आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल. पालकांच्या तक्रारींचीही गांभीर्याने दखल घेण्यात आली असून, वसतिगृहातील सुविधा आणि भोजन व्यवस्थेत आवश्यक सुधारणा करण्यासाठी उपाययोजना हाती घेतल्या जाणार आहेत.

### व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित

दरम्यान, विद्यार्थ्यांनी यापूर्वीही वसतिगृहात निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात असल्याची तक्रार अनेकदा केल्याचा दावा केला आहे. तक्रार करणाऱ्या विद्यार्थ्यांना दमदाटी केली जात असल्याचाही आरोप त्यांनी केला. शनिवारी काही विद्यार्थ्यांनी जेवणाचा पहिला घास घेतल्यानंतरच त्यांना मळमळ आणि उलट्या सुरू झाल्या, तर जेवण न केलेल्या विद्यार्थ्यांना कोणताही त्रास झाला नसल्याचेही विद्यार्थ्यांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, पोलीस अधीक्षक अश्विनी सानप, प्रांताधिकारी दीपक गिरासे, वैद्यकीय अधिकारी आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांनी रुग्णालयात धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. प्रयोगशाळेचा अहवाल आल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले असून, या घटनेमुळे शासकीय वसतिगृहांतील भोजन व्यवस्थेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# जळगाव जिल्हा बँकेकडून होत असलेल्या 'वसंत सहकारी साखर कारखान्या'च्या विक्रीबाबतची (लिलाव प्रक्रिया) माहिती

## अधिकृत टेंडर कॅटलॉगमध्ये इंग्रजी भाषेत अनेक कायदेशीर आणि तांत्रिक बाबी नमूद केल्या

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** या लिलावात जळगाव शहरापासून सुमारे 35 किमी अंतरावर असलेल्या वनकोठे (कासोदा, ता. एरंडोल) येथील कारखान्याची जमीन, इमारती, प्लांट आणि मशिनरी यांची एकत्रित विक्री केली जाणार आहे.
* यामध्ये 1,250 TCD (टन ऊस गाळप क्षमता प्रतिदिन) चा साखर कारखाना आणि 30 KLPD क्षमतेच्या डिस्टिलरीचा समावेश आहे.
2. लिलावाच्या महत्त्वाच्या तारखा आणि वेळा
* कारखाना पाहणीची तारीख: लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुक खरेदीदारांना 10 जुलै 2026 ते 22 जुलै 2026 या दरम्यान सकाळी 11 ते दुपारी 4 या वेळेत प्रत्यक्ष कारखान्याच्या ठिकाणी जाऊन मालमत्तेची पाहणी करता येईल.
* लिलावाची तारीख (ई-ऑक्शन): हा ऑनलाईन लिलाव 23 जुलै 2026 रोजी दुपारी 12:00 वाजता सुरू होईल आणि दुपारी 4:00 वाजता संपेल.
3. पैशांचे गणित (लिलावाच्या महत्त्वाच्या रकमा)
* राखीव किंमत/बेस प्राईज (Start Price): या कारखान्याची लिलावासाठी मूळ (सुरवातीची) किंमत 52 कोटी 83 लाख 81 हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे.
* अनामत रक्कम (Pre-Bid EMD): लिलावात भाग घेण्यासाठी



खरेदीदाराला आधी 5 कोटी 28 लाख 38 हजार रुपये बँक खात्यात अनामत रक्कम म्हणून भरावे लागतील.
* बोली वाढवण्याची रक्कम (Bid Increment): लिलावादरम्यान बोली वाढवताना ती किमान 1 लाख रुपयांच्या पटीतच वाढवावी लागेल.
4. लिलावाच्या प्रमुख आणि कडक अटी (शर्ती) * 'जसे आहे, तिथे आहे' (As is where is): ही विक्री "जसे आहे तिथे आहे" आणि "कोणतीही तक्रार न ऐकण्याच्या" (No Complaint basis) तत्त्वावर होत आहे.
खरेदीदाराने स्वतः सर्व गोष्टींची खात्री करणे अपेक्षित असून, मालमत्तेत नंतर काही त्रुटी निघाल्यास बँक किंवा लिलाव आयोजित करणारी MSTC कंपनी जबाबदार राहणार नाही.
* पैसे भरण्याचे नियम: जो व्यक्ती लिलाव जिंकेल, त्याला बँकेचे स्वीकृती पत्र मिळाल्यापासून 7 दिवसांच्या आत एकूण रकमेपैकी 30% रक्कम भरावी लागेल (यात त्याने आधी भरलेली अनामत रक्कम वळती केली जाईल).
* उर्वरित रक्कम: उरलेली 70% रक्कम, त्यावरील टॅक्स, 2.95% लिलाव शुल्क आणि 25,000 रुपये कागदपत्रांचे शुल्क हे सर्व 30 दिवसांच्या आत भरणे बंधनकारक आहे.
* पैसे भरण्यास विलंब झाल्यास कारवाई: जर 70% रक्कम भरण्यास उशीर झाला, तर बँक जास्तीत जास्त 3 महिन्यांची मुदतवाढ देऊ शकते, परंतु त्यावर खरेदीदाराला वार्षिक 18% दराने व्याज आकारले जाईल. मुदतीत पैसे न भरल्यास आधी भरलेली रक्कम (डिपॉझिट) बँक जप्त करेल आणि तो व्यवहार रद्द होईल.
* बँकेचा अंतिम अधिकार: लिलावात सर्वात मोठी बोली लागली (H-1 Bidder), तरीही त्यालाच कारखाना विकायचा की नाही, याचा अंतिम निर्णय घेण्याचा व बोली नाकारण्याचा सर्वस्वी अधिकार जळगाव जिल्हा बँकेकडे (JDCC) राहील.
* ऑटो-एक्स्टेंशन (Auto-Extension Time): लिलाव दुपारी 4 वाजता संपणार असला तरी, जर शेवटच्या क्षणी कोणी नवी बोली लावली, तर लिलावाची वेळ आपोआप 8 मिनिटांनी वाढवली जाईल.
* संपर्क अधिकाऱ्यांची माहिती: कारखान्याच्या जागेवर जाऊन मालमत्तेची पाहणी करण्यासाठी श्री. भिकन वाघ (9421544209) आणि श्री. अरविंद हरीभाऊ पाटील (9860914679) या अधिकाऱ्यांची नावे आणि मोबाईल नंबर कॅटलॉगमध्ये दिलेले आहेत. तसेच बँकेचे संपर्क व्यक्ती म्हणून सुनील जी. पाटील यांचा उल्लेख आहे.
* पैसे भरण्याची पद्धत: बँकेचे सर्व व्यवहार फक्त RTGS किंवा NEFT द्वारेच करावे लागतील.
डिमांड ड्राफ्ट (DD) किंवा पे-ऑर्डर (PO) अजिबात स्वीकारले जाणार नाहीत, आणि पाठवल्यास ते कोणतीही कारवाई न करता परत पाठवले जातील.
* अतिरिक्त छुपे शुल्क (Extra Charges): लिलाव जिंकणाऱ्या व्यक्तीला उरलेली 70% रक्कम भरताना, त्यासोबत 2.95% लिलाव शुल्क (Auction charges) आणि कागदपत्रांच्या प्रक्रियेसाठी (Misc Documentation handling charges) वरचे 25,000 रुपये वेगळे भरावे लागतील.
* खरेदीदाराचा मृत्यू झाल्यास (Death of Bidder): जर लिलाव जिंकणाऱ्या व्यक्तीचा व्यवहार पूर्ण होण्याआधीच दुर्दैवी मृत्यू झाला, तर त्याचे कायदेशीर वारसदार (Legal Heirs) हा व्यवहार पूर्ण करण्यासाठी जबाबदार असतील.

---

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# पाणीपुरवठ्याच्या विहिरीत मानवी विष्ठा टाकल्याचा आरोप

## लालगोटा गावात संतापाची लाट



जन सम्राट टाईम्स

**कुऱ्हा काकोडा (ता. मुक्ताईनगर) । प्रतिनिधी :** मुक्ताईनगर तालुक्यातील कुऱ्हा काकोडा परिसरातील आदिवासीबहुल लालगोटा गावात अत्यंत संतापजनक प्रकार उघडकीस आला आहे. आपसातील जुन्या वादातून गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरींमध्ये मानवी विष्ठा आणि लघवी टाकल्याचा गंभीर आरोप करण्यात आला असून, या घटनेमुळे संपूर्ण गावात संताप आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकारानंतर ग्रामस्थांनी संबंधित विहिरींचे पाणी वापरणेच बंद केले असून पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, काही महिन्यांपूर्वी फासेपारधी समाजाच्या लालगोटा गावात आपापसातील वादातून गंभीर गुन्हा घडला होता. त्या घटनेचा राग मनात ठेवून ३० जून रोजी काही महिलांनी दोन खासगी विहिरी आणि ग्रामपंचायतीच्या एका विहिरीत मानवी विष्ठा व मूत्र टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या गावात खासगी मालकीची एक विहीर शासनाने अधिग्रहित केली असून, त्या विहिरीतील पाणी ग्रामपंचायतीच्या विहिरीत सोडून संपूर्ण गावाला पाणीपुरवठा केला जातो. मात्र, या दोन्ही विहिरींसह आणखी एका विहिरीतही घाण टाकण्यात आल्याचा आरोप असल्याने ग्रामस्थांनी या पाण्याचा वापर पूर्णपणे बंद केला आहे. यामुळे गावातील बहुतांश नागरिकांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. सार्वजनिक पाणीपुरवठ्यावर अवलंबून असलेल्या नागरिकांना आता बंद अवस्थेतील हातपंपाचे दूषित पाणी वापरण्याची वेळ आली आहे. महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना सर्वाधिक त्रास सहन करावा लागत आहे. फासेपारधी समाजातील सामाजिक परंपरांमुळे या घटनेचे गांभीर्य आणखी वाढले आहे. समाजातील प्रथेनुसार, मानवी विष्ठा किंवा मूत्राचा स्पर्श झालेली व्यक्ती किंवा अशा पाण्याचा वापर करणाऱ्यांना सामाजिक बहिष्काराचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे ग्रामस्थांनी संबंधित विहिरीच वापरणे बंद केले असून, परिणामी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. घटना घडून दहा दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही ग्रामपंचायतीकडून कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. दूषित विहिरींचा उपसा, निर्जंतुकीकरण किंवा पाणीपुरवठ्याची पर्यायी व्यवस्था यापैकी कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

---

# अजितदादांच्या बॅनरवर झळकणार पवारांचा फोटो?

जन सम्राट टाईम्स

**जळगाव । प्रतिनिधी :** महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांच्या संभाव्य एकत्रिकरणाच्या चर्चांना वेग आला असतानाच जळगावातून एक महत्त्वाची राजकीय घडामोड समोर आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)चे जळगाव जिल्हाध्यक्ष संजय पवार यांनी पक्षाच्या बॅनर आणि प्रचार साहित्यावर शरद पवार यांचे छायाचित्र वापरण्यास त्यांची लेखी परवानगी मिळाल्याचा दावा केला आहे.

या दाव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे.

संजय पवार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, त्यांनी शरद पवार यांची प्रत्यक्ष भेट घेऊन प्रचार साहित्यावर त्यांचे छायाचित्र वापरण्याची विनंती केली होती. त्यानंतर शरद पवार यांनी संबंधित पत्रावर स्वतःच्या हस्ताक्षरात मान्यता नोंदवत स्वाक्षरी केल्याचा दावा त्यांनी केला. यासंदर्भातील पत्रही त्यांनी माध्यमांसमोर सादर केले.

संजय पवार यांच्या म्हणण्यानुसार, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडण्यापूर्वी पक्षाच्या बॅनर, पोस्टर आणि प्रचार साहित्यावर शरद पवार यांचे छायाचित्र नियमितपणे वापरले जात होते. मात्र, पक्ष विभाजनानंतर ते थांबविण्यात आले. वैयक्तिक संबंध आणि कुटुंबीयांतील जुने स्नेह लक्षात घेऊन त्यांनी पुन्हा परवानगी मागितल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पत्रामध्ये त्यांनी आपल्या वडिलांचे शरद पवार यांच्याशी असलेले जुने संबंध नमूद करत, मित्राच्या मुलाच्या नात्याने आपल्या प्रचार साहित्यावर त्यांचे छायाचित्र वापरण्याची परवानगी देण्याची विनंती केली होती. या विनंतीला शरद पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचा दावा संजय पवार यांनी केला आहे.

---

# विठ्ठल-रुक्मिणी मंदिर हे एकोप्याचे अधिष्ठान

## सभामंडपासाठी निधी देणार : पालकमंत्री गुलाबराव पाटील

जन सम्राट टाईम्स

**पाळधी / धरणगाव प्रतिनिधी :** धरणगाव तालुक्यातील खर्दे येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मंदिराच्या भूमिपूजन सोहळ्यात पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री तथा जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी उपस्थित राहून मंदिर उभारणीस सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. तसेच मंदिरासाठी आवश्यक सभामंडप उभारण्यासाठी *जिल्हा नियोजन विकास समिती (डीपीडीसी)*च्या माध्यमातून निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी जाहीर केले. यावेळी बोलताना पालकमंत्री गुलाबराव पाटील म्हणाले, "वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला भक्ती, समता आणि सेवाभावाचे अमूल्य संस्कार दिले आहेत. गावात उभे राहणारे विठ्ठल-




रुक्मिणी मातेचे मंदिर हे केवळ श्रद्धेचे स्थान नसून गावाच्या एकोप्याचे, संस्कारांचे आणि सामाजिक ऐक्याचे अधिष्ठान असते. मंदिराभोवती माणसे जोडली जातात, मने जोडली जातात आणि गावाच्या विकासाची नवी दिशा निर्माण होते. त्यामुळे मतभेद असतील तर ते विसरून गावाच्या प्रगतीसाठी सर्वांनी एकदिलाने काम करावे." ते पुढे म्हणाले की, "खर्दे गावात विठ्ठल-रुक्मिणी मातेचे मंदिर नसल्याची बाब वारकरी मंडळी, सरपंच आणि पदाधिकाऱ्यांनी माझ्या निदर्शनास आणून दिली होती. या मंदिराच्या उभारणीसाठी माझे पूर्ण सहकार्य राहील. तसेच डीपीडीसीच्या माध्यमातून सभामंडप उभारणीसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचाही प्रयत्न केला जाईल." जय गुरुदेव माध्यमिक विद्यालयात वृक्षारोपण भूमिपूजनानंतर पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या हस्ते जय गुरुदेव माध्यमिक विद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरण संवर्धन ही प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असून भावी पिढीला हिरवागार आणि समृद्ध वारसा देण्यासाठी वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाची चळवळ लोकसहभागातून अधिक बळकट करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात माजी तालुकाप्रमुख गजानन (नाना) पाटील यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या वारकरी संप्रदायाविषयीच्या आस्थेचा तसेच सामाजिक व धार्मिक कार्यातील योगदानाचा गौरव केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाय. डी. पाटील यांनी केले, तर आभार सरपंच कैलास पाटील यांनी मानले. मान्यवरांची उपस्थिती यावेळी जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष जानकीराम पाटील, सरपंच कैलास पाटील, उपसरपंच योगेश पाटील, ह.भ.प. विकास महाराज, ग्रामपंचायत सदस्य विजय पाटील, उमेश पाटील, विकास सोसायटीचे चेअरमन अनिल पाटील, मंगलाबाई बाविस्कर, प्रियंका कोळी, देविदास पाटील, विशाल पवार, माजी तालुकाप्रमुख गजानन (नाना) पाटील, हायस्कूलचे चेअरमन वसंतराव भोलाणे, माजी सभापती दीपक सोनवणे यांच्यासह ग्रामस्थ, वारकरी, पदाधिकारी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---


# नशिराबादमध्ये वन्यप्राण्याचा धुमाकूळ; लांडग्याच्या हल्ल्यात चार जनावरे ठार

## वन विभागाकडून तातडीने पंचनामा; जनावरे सुरक्षित ठेवण्याचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**नशिराबाद । प्रतिनिधी:** नशिराबाद शहरातील हेडकर मोहल्ला परिसरात वन्यप्राण्याने (लांडग्याने) अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील गजबजलेल्या सिव्हिल हॉस्पिटलजवळील भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये शिरून लांडग्याने केलेल्या भीषण हल्ल्यात तीन बकऱ्या आणि एक बोकड जागीच ठार झाले आहेत.

या घटनेने स्थानिक पशुपालकांमध्ये मोठी दहशत पसरली आहे. हेडकर मोहल्ला येथील रहिवासी शेख इरफान शेख नूर यांच्या मालकीच्या शेडमध्ये ही घटना घडली. मध्यरात्रीच्या सुमारास लांडग्याने शेडच्या पत्र्याचे नुकसान करून आत प्रवेश केला आणि जनावरांवर हल्ला केला. सकाळी हा प्रकार उघडकीस आल्यानंतर परिसरात खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे वनपाल उमाकांत कोळी, वनरक्षक हरीश थोरात (उमाळा) आणि स्वप्निल गोसावी (मेहरुण) यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. वन विभागाच्या पथकाने पंचनामा पूर्ण केला असून, मृतांचा आकडा पाहता संबंधित शेतकऱ्याला



शासनाकडून तातडीने मदत मिळावी, यासाठी प्रक्रिया सुरू केली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून नशिराबाद नगरपरिषदेचे नगराध्यक्ष योगेश पाटील आणि उपनगराध्यक्ष पंकज महाजन यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांनी नुकसानग्रस्त शेख इरफान यांचे सांत्वन केले आणि त्यांना सरकारी स्तरावरून जास्तीत जास्त आर्थिक मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. वन विभागाने नशिराबादच्या नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. रात्रीच्या वेळी जनावरे मोकळी न ठेवता सुरक्षित ठिकाणी बांधावीत, परिसराभोवती प्रकाश व्यवस्था ठेवावी आणि संशयास्पद वन्य हालचाली दिसल्यास तातडीने वन विभागाशी संपर्क साधावा, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. कोणत्याही अफवांना बळी न पडता नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

---


# पूराच्या विळख्यात आईचा मृतदेह छतावर

## केळवे रोड परिसरातील घटना

जन सम्राट टाईम्स

**पालघर | प्रतिनिधी :** मुसळधार पावसाने पालघर जिल्ह्यातील जनजीवन विस्कळीत झाले असताना केळवे रोड परिसरात घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण महाराष्ट्राला हादरवून सोडले आहे. पुराच्या पाण्याने घराला वेढा घातल्यामुळे एका मुलाला आपल्या आईचा मृतदेह तब्बल चार तास घराच्या छतावर ठेवून पाणी ओसरण्याची वाट पाहावी लागली. आईच्या निधनाचे दुःख आणि पुराच्या संकटाचा सामना अशा दुहेरी आघाताने या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. देवी पाडा येथील ५५ वर्षीय अनुसया लिलका यांच्यावर धुंदलवाडी ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू होते. रविवारी रात्री उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. सोमवारी पहाटे रुग्णवाहिकेतून त्यांचा मृतदेह घरी आणण्यात येत होता.

मात्र, केळवे रोड रेल्वे अंडरपासमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचल्याने रुग्णवाहिका पुढे जाऊ शकली नाही. अखेर नातेवाईकांनी मृतदेह खांद्यावर घेत पाण्यातून वाट काढत घरापर्यंत आणला. घरात पोहोचताच संकट आणखी गडद झाले. मुसळधार पावसामुळे काही वेळातच पुराचे पाणी घरात शिरू लागले आणि पाण्याची पातळी झपाट्याने वाढली. अशा परिस्थितीत मृतदेह पाण्यात वाहून जाण्याची किंवा खराब होण्याची भीती निर्माण झाली. त्यामुळे कुटुंबीयांनी अत्यंत धाडसाने स्वयंपाकघराच्या छतावरील दोन सिमेंट पत्रे तोडून मोठ्या कष्टाने मृतदेह घराच्या छतावर नेला. त्यानंतर प्लास्टिकने झाकून तो सुरक्षित ठेवण्यात आला. पूराचा वेढा



इतका गंभीर होता की, कुटुंबातील सदस्यांना तब्बल चार तास छतावरच थांबावे लागले. बाहेर जाण्याचा कोणताही मार्ग नव्हता. एका बाजूला आईच्या निधनाचे दुःख, तर दुसऱ्या बाजूला वाढत्या पुराच्या पाण्याची भीती अशा असह्य परिस्थितीत कुटुंबाने प्रत्येक क्षण व्यतीत केला. मदतकार्यालाही विलंब झाल्याने त्यांच्या यातनांमध्ये आणखी भर पडली. अखेर पावसाचा जोर कमी झाल्यानंतर आणि पूराचे पाणी हळूहळू ओसरल्यानंतर मृतदेह पुन्हा खाली आणण्यात आला. त्यानंतर गावातील नागरिक मदतीसाठी धावून आले. अंत्यसंस्कारासाठी आवश्यक लाकडांची व्यवस्था करण्यात आली आणि देवी पाडा स्मशानभूमीत अनुसया लिलका यांच्यावर धार्मिक विधीनुसार अंत्यसंस्कार करण्यात आले. या कठीण प्रसंगी ग्रामस्थांनी दिलेल्या सहकार्यामुळे कुटुंबाला काहीसा दिलासा मिळाला. या घटनेने पालघर जिल्ह्यातील पूरनियोजन आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या यंत्रणेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. विशेषतः केळवे रोड रेल्वे अंडरपासमध्ये दरवर्षी पाणी साचत असल्याच्या तक्रारी असतानाही कायमस्वरूपी उपाययोजना न झाल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. नैसर्गिक आपत्तीसमोर सामान्य नागरिक किती असहाय्य ठरू शकतो, याचे हे अत्यंत वेदनादायी उदाहरण मानले जात आहे.

---

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# लग्नाच्या वाढदिवसानिमित्त मुकबधिर विद्यार्थ्यांना जेवण व वह्यांचे वाटप

## के. जी. गुजराथी मुकबधिर निवासी विद्यालयात सामाजिक उपक्रम

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** धरणगाव येथील के. जी. गुजराथी मुकबधिर निवासी विद्यालयाचे अधीक्षक श्री. योगेश प्रकाश पाटील यांनी आपल्या लग्नाच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयातील मुकबधिर विद्यार्थ्यांना जेवण आणि शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. समाजाप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना प्रेमपूर्वक भोजन देण्यात आले. तसेच त्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन वह्यांचेही वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे मनापासून स्वागत करत योगेश पाटील यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अशा सामाजिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक साहित्यच नव्हे, तर समाजाकडून मिळणारे प्रेम, आपुलकी आणि प्रोत्साहनही मिळते, असे मत व्यक्त केले. वाढदिवस किंवा कौटुंबिक आनंदाचे क्षण समाजोपयोगी कार्यातून साजरे करण्याची प्रेरणा या उपक्रमातून मिळत असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रसंगी अधीक्षक योगेश प्रकाश पाटील, नंदू पाटील, किशोर पाटील, आरिफ शाह, अमोल सोनवणे, आदित्य योगेश पाटील, कल्पना ठाकरे तसेच विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमाबद्दल विद्यालय प्रशासन, शिक्षकवृंद आणि विद्यार्थ्यांनी योगेश पाटील यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत साजरा करण्यात आलेला हा आगळावेगळा वाढदिवस उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरला.



### विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हास्य फुलले. समाजाप्रती असलेली कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमात विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना प्रेमपूर्वक भोजन देण्यात आले. तसेच त्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन वह्यांचेही वाटप करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306